|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

जळगाव दि. १ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या माध्यमशास्त्र प्रशाळेत तीन महिन्याचे सहा पत्रकारिता प्रमाणत्र अभ्यासक्रम सुरु करण्यात आले आहे. या प्रमाणपत्र अभ्यासकमाच्या प्रवेश प्रक्रियेला सुरूवात झाली असून प्रवेशाची मुदत १४ ऑगस्ट, २०२३ पर्यंत आहे. या शिवाय 'डिप्लोमा इन जर्नालिझम (पत्रकारिता पदविका)' आणि 'एम.एम.एम.सी.जे. (जनसंवाद आणि पत्रकारिता)' या अभ्यासक्रमाची देखील प्रवेश प्रक्रिया सुरु आहे.

विद्यापीठाच्या माध्यमशास्त्र प्रशाळेच्यावतीने डिजिटल आणि सोशल मिडिया, कॅमेरा हॅन्डलिंग, व्हिडिओ एडिटींग, रेडिओ जॉकी, रायटींग फॉर न्यूजपेपर, न्यूजपेपर पेजिनेशन हे सहा प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरु करण्यात आले आहेत. हे प्रमाणपत्र अभ्यासक्रम कौशल्याधारित व रोजगारभिमुख असून त्या – त्या क्षेत्रातील तज्ज्ञांकडून हे अभ्यासक्रम तयार करण्यात आले आहेत. या प्रमाणपत्र अभ्यासक्रमांची ऑफलाईन प्रवेश प्रक्रिया सुरु झाली आहे. प्रवेशाकरिता १२ वी परीक्षा किमान ४० टक्यांसह उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. हे अभ्यासक्रम तीन महिन्याच्या मुदतीचे असून हे प्रमाणपत्र अभ्यासक्रम फक्त रविवारी दोन सत्रात तासिका होणार आहेत. त्यामुळे नोकरी, व्यवसाय, उद्योग सांभाळून हे अभ्यासक्रम पूर्ण करता येणार आहेत. या अभ्यासक्रमास त्या – त्या विषयातील तज्ज्ञांचे मार्गदर्शन लाभणार आहे. याशिवाय १२ वी नंतरचा एक वर्षीय पत्रकारिता पदविका आणि पदवी नंतरचा दोन वर्षीय 'एम.ए.एम.सी.जे.' या अभ्यासक्रमाची प्रवेश प्रकिया देखील सुरु आहे. प्रवेशासंबंधी अधिक माहितीसाठी माध्यमशास्त्र प्रशाळेचे संचालक प्रा.डॉ. सुधीर भटकर (8407922404), डॉ. गोपी सोरडे (9334166072) अथवा प्रशाळेत कार्यालयीन वेळेत 0257-2257436,2257438 या क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन माध्यमशास्त्र प्रशाळेचे संचालक प्रा.डॉ. सुधीर भटकर यांनी केले आहे.

## बातमी नं. २

जळगाव दि. १ (प्रतिनिधी) शिक्षणातून वेदनेचा सहवेदनेपर्यंतचा प्रवास घडावा आणि त्यासाठी आपल्या संवेदना जागृत असायला हव्यात असे प्रतिपादन नामवंत साहित्यिक व वक्ते प्रा. डॉ. विश्वाधार देशमुख यांनी केले.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागातर्फे आयोजित खान्देशकन्या कवयित्री बहिणाबाई चौधरी ऑनलाईन व्याख्यानमालेत "जाणावया वेदना, जागवू संवेदना!" या विषयावर ते बोलत होते. ते म्हणाले की माणसाचे दु:खाचे कारण तो स्व:त आहे. आभासी जगात न वावरता प्रत्यक्ष आयुष्य जगले पाहिजे. नाते व मित्र परिवाराच्या सुखा दु:खात सहभागी झाले पाहिजे, दुस-याच्या पायात काटा रूतला तो काढला पाहिजे. कोणाच्या तरी पायात रूतलेला काटा काढण्यासाठी संस्कृतीचा जन्म संवेदनाच्या पोटी झालेला आहे. सध्या समाजात संवेदना कमी होत असून माणसातील माणूसपण हरवत आहे. सुखापेक्षा जर तुम्ही दु:खाला वरच्या पातळीवर ठेवत असाल तर तुम्ही कधीही यशस्वी होऊ शकत नाही. आयुष्यात कायम कुढत राहू नका, स्वत:विषयी कमीत कमी विचार करावा. मन सुदृढ ठेवा म्हणजे तुम्ही सुखी व्हाल असे ही ते म्हणाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. साहेबराव भुकन (अधिष्ठाता, आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा) होते. ते म्हणाले की, यश मिळत गेले तरी माणसाने नम्र असावे व त्याचे पाय जमिनीवर असले पाहिजे. यश कधीच डोक्यात जायला नको. प्रत्येक माणूस हा आयुष्यभर सुखाचा शोध घेत असतो. त्यासाठी तो धडपड करीत असतो परंतू सुखापेक्षा समाधान महत्वाचे आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संचालक प्रा. आशुतोष पाटील यांनी केले. वक्त्याचा व अध्यक्षांचा परिचय छाया शिरसाळे हीने तर कार्यक्रमाचे सुत्रसंचालन वर्षा परदेशी हीने केले. योगेश महाजन याने आभार मानले.

## बातमी नं. ३

जळगाव दि.१ ( प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागाव्दारे शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये नवीन शैक्षणिक धोरण २०२० च्या संरचनेनुसार दि. १ ऑगस्ट, २०२३ पासून ऑनलाईन प्रवेश दिले जाणार आहे.

तळागाळातील व्यक्ती शिक्षणापासून वंचित राहू नये तसेच ज्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयात प्रवेश मिळाला नाही अथवा नोकरी करीत असल्यामुळे, घराची जबाबदारी अंगावर पडल्यामुळे पुढील शिक्षण घेता आले नाही, अशा विद्यार्थी, गृहिणी, नोकरदार व व्यवसाय करणाऱ्या महिला, शासकीय/निमशासकीय कर्मचारी, सामाजिक क्षेत्रात काम करणारी व्यक्ती, सेवा निवृत्त अधिकारी/कर्मचारी अशा सर्वांसाठी बहि:स्थ पद्धतीने प्रवेश सुरु करून शिक्षण प्रवाहात ग्रामीण जनतेला प्राधान्याने उच्च शिक्षणापर्यंत जाण्याची संधी उपलब्ध करुन देण्यासाठी कुलगुरु प्रा.व्ही.एल.माहेश्वरी यांनी पुढाकार घेतला आहे.

|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

## Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

या विभागातर्फे मराठी, हिंदी, इंग्रजी, समाजशास्त्र, इतिहास, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, संरक्षण व सामारिकशास्त्र, समुपदेशन मानसशास्त्र हे विषय घेऊन एम.ए. करता येईल. एम.ए. (शिक्षणशास्त्र) तसेच एम.कॉम. हे अभ्यासक्रम देखील करता येणार आहे. पाठयक्रम हा कबचौउमविचाच राहणार आहे. पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा सत्र पद्धतीने होतील. प्रवेशीत विद्यार्थ्यांना विषयानुसार स्वयंअध्ययन साहित्य छापिल पुस्तके, मुद्रित, टंकलिखिते वा अनुषंगिक तत्सम साहित्य सॉफ्ट कॉपी स्वरुपात उपलब्ध करून देण्यात येणार आहे.ठराविक रविवारी अथवा सुटीच्या दिवशी संमंत्रण सत्रांचे आयोजन केले जाईल. विद्यापीठाच्या www.nmu.ac.in या संकेतस्थळावर गेल्यानंतर होमपेजवरील आडव्या बारवर Academics अंतर्गत Department of Lifelong Learning and Extension वर संपूर्ण माहिती पाहता येईल, अधिक माहितीसाठी 0257-2257495/ 2258496 तसेच website-https://nmu.ac.in/external-education या पोर्टलवर भेट द्यावी. अशी माहिती संचालक प्रा.आशुतोष पाटील यांनी दिली.

---

जा.क्र.: कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२३ दिनांक: १ ऑगस्ट, २०२३

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी